Ph.D. Entrance test
Arts
Performing Folk Arts

143-p3-d-upq-FH KL April 12
Con. 3041-12.

**KK-2522**

(३ तास)

**एकूण गुण : १००**

28th April, 2012

**सूचना** (१) विभाग **१** मधील **सर्व** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.
(२) विभाग **२** मधील **पाच** लघुत्तरी प्रश्नांपैकी कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा.
(३) विभाग **३** मधील **चार** दीर्घोत्तरी प्रश्नांपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा.

## विभाग १ (गुण ४०)

१. गोंधळाचे दोन प्रकार —
(अ) रेणुराई (ब) कदमराई (क) गौळणीचा गोंधळ (ड) भैरवी गोंधळ

२. संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा —
(अ) कपिल वात्स्यायन (ब) लीला सॅम्सन (क) जया भादुरी

३. यक्षगानाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा मान्यवर —
(अ) गिरीश कर्नाड (ब) डॉ. जब्बार पटेल (क) शिवराम कारंथ

४. संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त तमाशा, लोकनाट्यातील विनोदी कलावंत —
(अ) दादा कोंडके (ब) लीलाधर हेगडे (क) दादू इंदुरीकर

५. पद्मश्री प्राप्त लावणी कलावंत स्त्री —
(अ) गुलाबबाई संगमनेरकर (ब) यमुनाबाई वाईकर (क) रोशन सातारकर

६. नाटकाला खालील वेद म्हणून संबोधले जाते —
(अ) पंचमवेद (ब) अथर्व वेद (क) सामवेद

७. राजस्थानातील तमाशा सदृश्य लोककला प्रकार —
(अ) भवाई (ब) रास (क) कुचामणी ख्याल

८. संगीत नाटक अकादमीचे मुख्य कार्यालय खालील एका ठिकाणी आहे —
(अ) मुंबई (ब) कलकत्ता (क) चंदिगढ (ड) नवी दिल्ली

९. टागोर सन्मान (संगीत नाटक अकादमीचा) प्राप्त झालेले लोकसाहित्याचे संशोधक —
(अ) डॉ. प्रभाकर मांडे (क) डॉ. गंगाधर मोरजे
(ब) डॉ. अशोक रानडे (ड) डॉ. रा. चिं. ढेरे

१०. दशावतारातील विनोदी पात्र —
(अ) सोंगाड्या (ब) रंगला (क) विदूषक (ड) संकासूर

११. महाराष्ट्रातील विधिनाट्य —
(अ) गोंधळ (ब) किर्तन (क) दशावतार (ड) तमाशा

१२. 'विच्छा माझी पुरी करा' लोकनाट्याचे लेखक —
(अ) गंगाराम गव्हाणकर (क) दादा कोंडके
(ब) शंकर पाटील (ड) वसंत सबनीस

[ TURN OVER

१३. खंडोबाचे तीर्थक्षेत्र —
(अ) माहूर (ब) नळदूर्ग (क) ओझर (ड) रांजणगाव

१४. देवीच्या साडेतीन शक्तीपीठापैकी एक —
(अ) देहू (ब) आळंदी (क) माहूर (ड) शिंगणापूर

१५. 'खंडोबाचं लगीन' या आय.एन.टी. च्या नाटकाचे लेखक —
(अ) अशोक जी. परांजपे (क) सुरेश चिखले
(ब) विठ्ठल उमप (ड) डॉ. तुलसी बेहेरे

१६. 'खडी गंमत' हा कलाप्रकार खालीलपैकी एका प्रदेशात लोकप्रिय आहे —
(अ) उत्तर महाराष्ट्र (क) विदर्भ
(ब) तळकोकण (ड) मराठवाडा

१७. लोकसाहित्य क्षेत्रातील मान्यवर विदुषी —
(अ) विजया राजाध्यक्ष (क) दुर्गा भागवत
(ब) सरोजिनी वैद्य (ड) कुसुमावती देशपांडे

१८. 'गाढवाचं लग्न' वगनाट्याचे लेखक —
(अ) पठ्ठे बापूराव (क) होनाजी बाळा
(ब) हरी वडगावकर (ड) भाऊ फकुड

१९. शंकराने केलेले नृत्य —
(अ) कथ्थक (क) तांडव
(ब) भरत नाट्यम् (ड) ओडिसी

२०. राजस्थानातील प्रख्यात लोकनृत्य —
(अ) भांगडा (क) कालबेलिया
(ब) रास (ड) गर्बा

२१. भक्तीप्रधान लोककला प्रकार —
(अ) रंगले-रंगली (ब) कीर्तनीया (क) सिधी धमाल

२२. पद्मभूषण प्राप्त लोककलावंत —
(अ) शाहीर साबळे (ब) तीजनबाई (क) दादा कोंडके

२३. 'घाशीराम कोतवाल' नाटकाचे नृत्य दिग्दर्शक —
(अ) डॉ. जब्बार पटेल (क) कृष्णराव मुळगुंद
(ब) डॉ. मोहन आगाशे (ड) सुबल सरकार

२४. 'तारपा' हे वाद्य खालील वस्तू पासून बनवितात —
(अ) बांबू (क) घोरपडीचे चर्म
(ब) भोपळा (ड) मेण

२५. 'फू बाई फू' भारूड लोकप्रिय केलेल्या लोककलावंताचे नाव —
(अ) शाहीर साबळे (क) शाहीर विठ्ठल उमप
(ब) शाहीर निवृत्ती पवार (ड) शाहीर हेगडे

२६. 'लोकसंस्कृतीचे उपासक' ग्रंथाचे लेखक —
(अ) डॉ. प्रभाकर मांडे (क) डॉ. गंगाधर मोरजे
(ब) डॉ. रा. चि. ढेरे (ड) डॉ. रामचंद्र देखणे

२७. वारकरी किर्तन परंपरेतील श्रेष्ठ किर्तनकार —
(अ) ह.भ.प. शंकरबापू आपेगावकर (क) ह.भ.प. रामचंद्रबुवा कऱ्हाडकर
(ब) ह.भ.प. सोनोपंत दांडेकर (ड) ह.भ.प. शेगावचे गजानन महाराज

२८. 'वारियाने कुंडल हाले' गौळणीचे रचनाकार —
(अ) संत रामदास (क) संत नामदेव
(ब) संत कान्होपात्रा (ड) संत बहिणाबाई

२९. भागवत मंदिराचा पाया रचणारा संत —
(अ) संत रामदास (ब) संत तुकाराम (क) संत ज्ञानेश्वर (ड) संत गोरोबा

३०. कीर्तनातील एक वाद्य —
(अ) ढोलकी (ब) सारंगी (क) पखवाज (ड) दिमडी

३१. 'संबळ' हे वाद्य खालील विधिनाट्यात वापरतात —
(अ) जागरण (ब) गोंधळ (क) भराड

३२. खंडोबाला प्रिय असणारी वस्तू —
(अ) तुळस (ब) बेल (क) दवणा (ड) नागवेलीचे पान.

३३. 'येई ओ विठ्ठले' आरतीचा कर्ता —
(अ) केशवदास (ब) रामदास (क) तुकाराम (ड) विष्णुदास नामा

३४. दशावताराचे जनक —
(अ) गोडसे भटजी (ब) गोरे भटजी (क) विष्णुदास (ड) भानुदास

३५. आय. एन. टी. संस्थेचे पूर्ण नाव —
(अ) इंटर नॅशनल थिएटर (क) इंडियन नॅशनल थिएटर
(ब) इंडिया नेशन थिएटर (ड) इंटर नेशन थिएटर

३६. हे जुळेभाऊ तमाशात विनोदी नट म्हणून प्रसिद्ध आहेत —
(अ) भाऊ फकुड (ब) होनाजी बाळा (क) सातू हिरू (ड) काळू बाळू

३७. तमाशातील प्रसिद्ध तालवाद्य —
(अ) ताशा (ब) ढोलकी (क) दिमडी (ड) ढोल

[ TURN OVER

३८. खंडोबाचा प्रधान —
(अ) भैरव (ब) कार्तिकेय (क) हेगडी (ड) ज्योतिबा

३९. गुजरातचा लोकप्रिय लोककला प्रकार —
(अ) रास (ब) अंकिया नाट (क) भवाई

४०. 'नटरंग' कादंबरीचे लेखक —
(अ) विश्वास पाटील (ब) शंकर पाटील (क) आनंद यादव (ड) व्यंकटेश माडगूळकर

## विभाग २ (गुण ३०)

(**विभाग २** मधील **पाच** लघुत्तरी प्रश्नांपैकी कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा.)

१. 'भवाई' या गुजरातमधील लोककला प्रकाराची सविस्तर माहिती द्या.

२. लोकशाहीर विठ्ठल उमप यांचे लोकरंगभूमीवरील योगदान स्पष्ट करा.

३. कोकणातील लोककला प्रकारांची माहिती सांगा.

४. 'भारूड' म्हणजे काय ? हे स्पष्ट करून, एखाद्या भारूडाचे निरूपण शब्दबद्ध करा.

५. 'गोंधळ, जागरण ही विधिनाट्ये आहेत.' या विधानाचा परामर्श घ्या.

## विभाग ३ (गुण ३०)

(**विभाग ३** मधील **चार** दीर्घोत्तरी प्रश्नांपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा.)

१. तमाशाचा आकृतीबंध स्पष्ट करा.

२. 'लोककला ह्या परंपरेचे विज्ञान आहेत.' या विधानाचा परामर्श घ्या.

३. प्रयोगात्म लोककलेचे रस सापेक्ष वर्गीकरण करा.

४. लावणीचे प्रकार स्पष्ट करून, एखाद्या पारंपरिक लावणीचे रसग्रहण करा.